# दि चंद्रपुर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, चंद्रपुर

## प्रमुख कार्यालय, सिव्हील लाईन्स, चंद्रपुर पिन कोड नं. ४४२४०१ पोस्ट बॉक्स नं. २९

## "पाहीजेत"

दि चंद्रपुर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., चंद्रपुर या बँकेत मा. राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) यांचे परीपत्रक क्र. / एनबी / एमआरओ / डी.सी.आर.आर. /३१४/सिआरआर/६/ २०११-१२ दि.०३/०८/२०११ अन्वये फिट ॲन्ड प्रॉपर क्रायटेरिया प्रमाणे सी. ई. ओ. (मुख्य कार्यकारी अधिकारी) पद सरळसेवा भरतीने भरावयाचे आहे. त्याकरीता खाली नमुद श्रेणीतील रिक्त पदाकरीता अर्हताधारक पात्र उमेदवारांकडुन दि. २१/०२/२०१४ पावेतो कार्यालयीन वेळेत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत पोहोचतील या बेताने खालीलप्रमाणे अर्ज मागविण्यांत येत आहे.

१) पदाचा तपशिल :- सी.ई.ओ. (मुख्य कार्यकारी अधिकारी)

१) पदाची संख्या:- एक

२) वेतनश्रेणी :- गुणवत्ता अनुभव-शैक्षणिक पात्रता इ. विचारात घेता बँक व्यवस्थापनाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे वेतन श्रेणीवर अथवा कंत्राटी पध्दतीने वार्षीक पॅकेज पध्दतीवर आधारीत/ कंत्राटामधील अटीशर्तीनुसार ठरल्याप्रमाणे असेल.

२) शैक्षणिक अर्हता :-

१)कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची (मुक्त विद्यापीठे वगळुन) कोणत्याही शाखेतील पदवी व सीएआयआयबी / डिबीएफ / डीप्लोमा इन को- ऑपरेटीव्ह बीजनेस मॅनेजमेंट सहीत किंवा समकक्ष अर्हता

२) चार्टर्ड /कॉस्ट अकाऊंटंट

३) मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेची पदव्युत्तर पदवी (पोस्ट ग्रॅज्युएट)

३) अनुभव :- बँकिंग क्षेत्रात मिडल मॅनेजमेंन्ट MM -I (Third level scale/cadre on-wards ) व त्यावरील श्रेणीत काम केल्याचा किंवा मुख्य कार्यकारी अधिकारी पदाखालील पदावर काम केल्याचा किमान ८ वर्षाचा अनुभव असणे अत्यावश्यक .

४) वयोमर्यादा :- दि. २१/२/२०१४ ला उमेदवाराचे वय **३५ वर्षापेक्षा कमी** व ५५ वर्षापेक्षा जास्त नसावे.

५) नियुक्ती कालावधी :- प्रथम नियुक्ती कालावधी एक वर्षासाठी वार्षिक पॅकेज पध्दतीवर बँकेच्या अटी शर्तीनुसार निश्चित केल्या प्रमाणे असेल.

(पुढील पानावर)

६) अर्ज हा बँकेच्या मा. अध्यक्ष यांचे नावाने सुवाच्छ व सर्व तपशीलासह परीपुर्णपणे नमुद करून शैक्षणीक अर्हता व अनुभव यांचे आवश्यक प्रमाणपत्रासह दि. २१/२/२०१४ पर्यंत बँकेच्या खालील पत्यावर," दि चंद्रपुर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या., चंद्रपुर प्रमुख कार्यालय, सिव्हिल लाईन चंद्रपुर पिन कोड नं. ४४२४०१ पोस्ट बॉक्स नं. २९" (महाराष्ट्र राज्य ) प्राप्त होईल अशा बेताने सादर करावे.या मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार करण्यांत येणार नाही.

७) मुख्य कार्यकारी अधिकारी पदाकरीता नाबार्डचे परीपत्रकातील Annexure -II प्रमाणे ड्यु. डिलीजन्सची माहीती प्रत्यक्ष मुलाखतीस येतांना सादर करणे अनिवार्य राहील. सदरचा नमुना मुलाखत पत्रासोबत पाठविण्यात येईल.

८)प्राप्त अर्जाची छानणी करुन योग्य व पात्र उमेदवारांना स्वखर्चाने आवश्यक असल्यास लेखी परीक्षा ऑन लाईन अथवा ऑफ लाईन / प्रत्यक्ष मुलाखतीकरीता हजर राहावे लागेल. लेखी परीक्षा/मुलाखतीची तारीख, स्थळ व वेळ उमेदवारांना पत्राव्दारे तसेच एसएमएस व्दारे त्यांचे अर्जात नमुद मोबाईल फोनवर कळविण्यांत येईल.

९) अर्जासोबत कागदपत्रे सत्यापित करून जोडावी लागेल. प्राप्त अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती /कागदपत्रे खोटी असल्याचे निदर्शनांस आल्यास त्या उमेदवाराची निवड /नियुक्ती रद्द करण्याचे अधिकार बँकेला भरती प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा भरती झाल्यानंतरही राहतील. नसेच नियुक्ती प्रक्रिया कोणत्याही कारणाने नाबार्ड / आरबीआय / एसएलटीएफ/न्यायालय / तत्सम सक्षम कार्यालय यांनी रद्दबातल अथवा नियमबाह्य ठरविल्यास कोणत्याही क्षणी कमी करण्याचा अधिकार बँक राखुन ठेवीत आहे.

१०) निवड प्रक्रियेनंतर प्रशिक्षण कालावधी (ट्रेनिंग पिरेड) उमेदवारीचा कालावधी व कराराच्या अटी शर्ती निश्चित करून सेवेत रूजु केल्या जाईल याचे संपुर्ण अधिकार बँक व्यवस्थापनास राहतील.

११) योग्य उमेदवार अथवा पुरेसे अर्ज न आल्यास अथवा बँकेस समाधान कारक उमेदवार न मिळाल्यास लेखी परिक्षा / मुलाखत घेणे न घेणे/ भरती करणे अथवा न करणे याचा अधिकार बँक व्यवस्थापन राखुन ठेवीत आहे.

१२) जाहीरातीमधील एखादी अट शिथिल करणे वा ज्यादाची अट घालणे अथवा रद्द करणे अथवा संपुर्ण जाहिरात रद्द करणे हा अधिकार बँक व्यवस्थापन राखुन ठेवीत आहे.

सदर जाहीरात उमेदवार निवडीसाठी असुन निवडीनंतरच भरती प्रक्रिया राबविण्यात येईल. निवड झाली म्हणजे भरती झाली असे समजण्यात येवु नये. अथवा हक्क सांगता येणार नाही.

(पुढील पानावर)

शैक्षणिक अर्हता/ अनुभव अथवा अटी शर्तीची पुतर्ता न करणाऱ्या उमेदवारास,पुढील भरती प्रक्रिये संबंधाने बँक, अशा उमेदवाराचा, लेखी परीक्षा/मुलाखात इ. भरती प्रक्रियेसाठी विचार करणार नाही.

भरती प्रक्रिया स्वतंत्र भरती यंत्रणे मार्फत राबविणे अथवा ना राबविणे यांचे अधिकार बँक राखुन ठेवीत आहे.

अध्यक्ष